<u>दो षा रो प</u>

नेवासा येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.१

यांचे न्यायालयात.

( मी श्रीमती. डॉ. पी. आर. सुगांवकर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, नेवासा, जि. अहमदनगर तुमचेवर दोषारोप ठेवत आहे की,)

नियमित फौजदारी ख.क्र.२४३/२०२५ नि.१९

१. **संतोष गोरख एकनार,**
वय – २८ वर्षे, व्यवसाय - शेती

२. **गोरख हिरामन एकनार,**
वय – ५४ वर्षे, व्यवसाय - शेती

३. **सुनिता एकनाथ एकनार,**
वय – ४७ वर्षे, व्यवसाय - शेती

४. **कमलाबाई बाबासाहेब एकनार,**
वय – ७२ वर्षे, व्यवसाय - शेती

सर्व रा.भेंडा खुर्द, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर.

**दोषारोप :**

तुम्ही दिनांक ०१/०३/२०२५ रोजी दुपारी ०१.३० वा.चे सुमारास मौजे नेवासा येथे फिर्यादी तिचे मुलांसोबत बोलण्यास कोर्टाच्या गेटचे दरवाजा जवळील बाकावर गेली असता तेथे आरोपी क्र.१ ने तिच्या बगलात हात घालुन मागे ओढुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न असे कृत्य केले व त्यायोगे आरोपीने **भारतीय न्याय संहिता कलम ७४** प्रमाणे गुन्हा केला आहे.

वरील दिवशी, ठिकाणी, वेळी तुम्ही आरोपींनी आपसात संगणमत करुन फिर्यादीस लाथाबुक्याने मारहाण करुन व इच्छापूर्वक दुखापत पोहचवली व त्यायोगे आरोपींभ**ारतीय न्याय संहिता कलम ११५(२) सह ३(५)** प्रमाणे गुन्हा केला आहे.

वरील दिवशी, ठिकाणी, वेळी तुम्ही आरोपींनी आपसात संगणमत करुन फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली व अन्वये आरोपींनी **भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२) सह ३(५)** प्रमाणे गुन्हा केला आहे.

वरील दिवशी, ठिकाणी, वेळी तुम्ही आरोपींनी आपसात संगणमत करुन

फिर्यादीस शिवागाळ करुन तिचा अपमान केला व तिच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होण्यास प्रोत्साहन दिले व त्यायोगे आरोपींनी **भारतीय न्याय संहिता कलम ३५२ सह ३(५)** प्रमाणे गुन्हा केला आहे.

वरील सर्व गुन्हे न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रातील आहेत. त्यामुळे तुमच्या विरोधात उपरोक्त नमुद कलमावरुन दोषारोप ठेवण्यात येतो.

दिनांक- १४/०८/२०२५ **(डॉ. पी. आर. सुगांवकर)**

नेवासा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,

नेवासा

आरोपींवरील दोषारोप तयार करण्यात आले व त्यांना त्यातील मजकुर त्यांच्या भाषेत समजावून सांगणेत आला.

दिनांक- १४/०८/२०२५ **(डॉ. पी. आर. सुगांवकर)**

नेवासा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,

नेवासा